चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

१६ फेब्रुवारी, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक १५/०२/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, बल्लारशाह, रामनगर, भद्रावती, ब्रम्हपुरी, पाथरी, सिंदेवाही, राजुरा, विरूर, जिवती** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **११** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **०५** आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **३,७०,८००/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————

# अधिसूचना

दि. १७/०२/१९ रोजी चिमुर येथे घोडा यात्रा असुन यात्रेस ५० हजार भावीक येण्याची शक्यता आहे. चिमुर येथील रस्त्याची स्थिती पाहता तसेच कार्यक्रमाला येणारा जनसमुदाय पाहता चिमुर येथुन जाणाऱ्या जड वाहतुकीमुळे अपघात होवु नये तसेच काही अनुचित प्रकार घडु नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता चिमुर शहरातुन जाणाऱ्या जड वाहतुकीस ठराविक वेळेकरीता निर्बंध घालणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम–१९५१ च्या कलम–३३(१)(ब) अन्वये लोकांस धोका, अडथळा किंवा गैरसोय होवु नये तसेच कोणत्याही प्रकारचा अपघात होवु नये व कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी दि. १७/०२/१९ चे १८:०० वा. पासुन ते दि. १८/०२/१९ चे ०६:०० वा. पर्यंत व दि. २०/०२/१९ चे ८:०० ते १८:०० वा. पावेतो खालील प्रमाणे जनतेला निर्देश देत आहे.

**१. काम्पा मार्गे व नेरी मार्गे चिमुर शहरात येणारी जड वाहतुक आरटीएम चौकाच्या पलिकडे थांबुन राहील. सदर वाहतुकीस आरटीएम चौकापासुन पासुन चिमुरकडे येण्यास मज्जाव करण्यात येत आहे.**

**२. भिसीकडुन येणारी वाहतुक पिंपळणेरीच्या पलीकडे थांबुन राहील. सदर मार्गाने येणाऱ्या जड वाहतुकीस पिंपळनेरी पासुन चिमुरकडे येणास मज्जाव करण्यात येत आहे.**

**३. वरोरा/शेगांव कडुन येणारी वाहतुक शेडगांवच्या पलिकडे थांबुन राहील. सदर मार्गाने येणारी जड वाहतुकीस शेडगाव पासुन चिमुरकडे येणास मज्जाव करण्यात येत आहे.**

**सदर अधिसूचना दि. १७/०२/१९ चे १८:०० वा. पासुन ते दि. १८/०२/१९ चे ०६:०० वा. पर्यंत तसेच दि. २०/०२/१९ चे ८:०० ते १८:०० वा. पावेतो अंमलात राहील.** चिमुर येथे यात्रेला येणाऱ्या भावीकांची गर्दी पाहुन वरिल निर्देशात बदल करण्यात येईल. वरिल निर्देशांचे पालन करुन पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

---